# श्यामची आई स्मृतीशताब्दी समितीच्या वतीने विविध स्पर्धा संपन्न

रत्नागिरी : श्यामची आई स्मृतीशताब्दी समिती, जिल्हा रत्नागिरी यांच्या वतीने साने गुरुजींच्या आई यशोदा सदाशिव साने यांच्या स्मृतीशताब्दी वर्षानिमित्त कथाकथन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व काव्य वाचन स्पर्धा घेण्यात आल्या.

रत्नगिरीतील गोदूताई जांभेकर विद्यालयात संपन्न झालेल्या स्पर्धकांना स्पर्धकांनी मोठा प्रतिसाद दिला. ०२ नोव्हेंबर २०१६ ते ०२ नोव्हेंबर २०१७ पर्यंत चालणाऱ्या या स्मृतीशताब्दी वर्षात विविध उपक्रम सतत चालू आहेत. त्या अनेक उपक्रमांपैकी एक म्हणजे ह्या विविध स्पर्धा.

ह्या स्पर्धा श्यामची आई स्मृतीशताब्दी समिती, जिल्हा रत्नागिरी व स्वयंसेतू संस्था रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाल्या. या स्पर्धांसाठी  लागणारी पुस्तकरूपातील सर्व पारितोषिके सामाजिक कार्यकर्ते श्री. संदीपजी गावडे साहेब यांनी पुरस्कृत केली होती.

या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी साधना साप्ताहिकाचे संपादकाचे विनोद शिरसाट, हेरंब कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखालील सामाजिक कार्यकर्त्या तथा समितीच्या प्रमुख सौ. श्रद्धा कळंबटे, सौ. दिपाली सावंत, श्री. माणिकराव बाबर, मनोज खानविलकर, सौ. सविता बर्वे मॅडम, हर्षदा पटवर्धन, अरूणा सरपोतदार, श्री. आनंद शेलार यांच्यासह माधव अंकलगे यांनी विशेष सहकार्य केले. मीनल भंडारे, शिवाजी बोटके या सर्व स्पर्धांसाठी मकरंद दामले, जयंत अभ्यंकर, प्रतिभा प्रभूदेसाई, विशाखा सकपाळ, डॉ. निधी पटवर्धन व ज्योती मुळ्ये यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या स्मृतीशताब्दी वर्षानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धांचा निकाल पुढीलप्रमाणे-

प्रथम-धनश्री अनंत पांचाळ- खेडशी हायस्कूल, द्वितीय-रिया सचिन पटवर्धन- जीजीपीएस, रत्नागिरी, तृतीय-हर्ष सुरेंद्र नागवेकर- पटवर्धन हाय. रत्नागिरी.

उत्तेजनार्थ- अवनी मयुरेश आठवले-जीजीपीएस, रत्नागिरी.

स्पर्धेचे नाव- वक्तृत्व स्पर्धा, गट -महाविद्यालयीन

प्रथम- ऋषिकेश विवेक वैद्य, पां. शं. बा. क महा. खंडाळा, द्वितीय- ऋतुराज राजेश सोहनी, डीबीजे कॉलेज, चिपळूण, तृतीय- सिद्धी अरुण नार्वेकर, गांधी कॉमर्स कॉलेज, रत्नागिरी. उत्तेजनार्थ- ऋतुजा आनंदराव व्हरकट- अभ्यंकर कुलकर्णी कॉलेज, रत्नागिरी.

गट खुला (वक्तृत्व स्पर्धा)

प्रथम- संपदा यशवंत आंब्रे, भागोजीशेठ कीर लॉ कॉलेज, रत्नागिरी, द्वितीय- प्रभाकर यशवंत धोपट, खंडाळा हायस्कूल, खंडाळा तृतीय- विनायक गजानन सुर्वे- पा. शं. बा. कॉलेज, खंडाळा. उत्तेजनार्थ- अश्विनी प्रदीप कांबळे, नवनिर्माण कॉलेज, रत्नागिरी.

स्पर्धेचे नाव- काव्यवाचन- शालेय गट

प्रथम क्रमांक-साहिल प्रविण भोसले, गार्गी वासुदेव आठल्ये दोन्हीना विभागून.

द्वितीय- दर्शिन हेमंत कापडी, तृतीय- स्वरूप पद्माकर जोशी, धनश्री अनंत पांचाळ, द्वितीय व तृतीयला (विभागून).

खुला गट- प्रथम- विजय बिळूर, द्वितीय- विजय सुतार, तृतीय- तुषार मांडवकर.

सर्व विजयी स्पर्धकांना सन्मानपत्र, पुस्तकांच्या स्वरूपात पारितोषिके आकाशवाणी रत्नागिरीचे कार्यक्रमाधिकारी श्री. सुहास विध्वांस यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी श्री. सुहास विध्वांस यांनी आपले मनोगतातून उपस्थितांना मार्गदर्शन केले.

.....................................................

मा. संपादक

वरील वृत्तास आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्धी द्यावी ही नम्र विनंती.